**<u>ठळक बातम्या</u>**

- अतिवृष्टीग्रस्त भागात नुकसानीची पाहणी करण्यासाठी मंत्र्यांचे दौरे सुरु / आवश्यक तिथं नियम शिथिल करुन तातडीनं मदत देण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

- मुसळधार पावसामुळे आजही अनेक जलाशयांमधून विसर्ग सुरु

- सुमारे ९५ हजार कोटी रुपयांच्या ६ प्रस्तावांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी, वैद्यकीय पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी क्षमता वाढवायला मान्यता

- ज्येष्ठ कन्नड साहित्यिक एस एल भैरप्पा यांचं निधन

**आणि**

- गडचिरोली जिल्ह्यात एकूण ६२ लाख रुपयांचं इनाम असलेल्या सहा जहाल माओवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><>**

राज्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागात नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्र्याचे दौरे सुरु झाले आहेत. मराठवाडा, सोलापूर, अहिल्यानगर इथं गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं. राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पाठीशी असून नागरिकांना सर्वोतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. आपत्तीच्या काळात आवश्यक तिथे नियम शिथिल करुन तातडीनं मदत वितरित करावी, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी देवेंद्र फडनवीस यांनी आज सकाळी **सोलापूर** जिल्ह्यात माढा तालुक्यातील निमगाव आणि सिना दारफळ या गावांना भेट देत पूरस्थितीची पाहणी केली. त्यावेळी ते बोलत होते. ...

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री**

पुरात अडकलेल्या नागरिकांना मदत करण्याचं काम एनडीआरएफनं चोख बजावल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तसंच घरात पाणी जाऊन नुकसान झालेल्या नागरिकांनाही अधिकचे नियम न लावता शासन मदत

करेल, असं त्यांनी सांगितलं. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी आज लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांनाही भेट दिली.

**उपमुख्यमंत्री अजित पवार** यांनी आज सोलापूर जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागाचा आढावा घेतला. आपद्ग्रस्तांशी संवाद साधत त्यांनी नुकसानभरपाईसाठी त्वरित कार्यवाही करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या. **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांनी देखील **धाराशिव** जिल्ह्यात पूरस्थितीची पाहणी केली.

**कृषीमंत्री दत्तात्रय भरणे** यांनी जालना आणि अहिल्यानगर जिल्ह्यातल्या पूरग्रस्त भागांचा दौरा करत शेतकऱ्यांशी संवाद साधला. जालना जिल्ह्यातल्या पंचनाम्याचं काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

मंत्री **पंकजा मुंडे** यांनी आज जालना जिल्ह्यात घनसावंगी इथं तसंच बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातल्या गावांना भेट देऊन पाहणी केली. मेघना बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्याचा दौरा केला. जलसंधारण आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री **गिरीश महाजन** यांनी मराठवाड्यात **धाराशिव**, बार्शी इथल्या पूरग्रस्त गावांचा दौरा करून आढावा घेतला.

**दरम्यान,** या आपत्कालीन परिस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागानं सज्ज राहून नागरिकांना अखंडित आरोग्य सेवा द्यावी, अशा सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या. मुंबईत आरोग्य भवन इथं राज्यस्तरीय बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><>**

मुसळधार पावसामुळे नद्यांचे प्रवाह वाढले असून राज्यातल्या अनेक जलाशयांमधून पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. पैठणच्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९८ टक्क्यांवर गेला आहे. धरणात सध्या ६६ हजार ७६९ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक सुरु असून, विसर्ग कमी करण्यात आला आहे. सध्या धरणातून १८ हजार ८६४ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

नांदेडमध्ये विष्णुपुरी प्रकल्पाचे १६ दरवाजे उघडण्यात आले आहेत. प्रकल्पातून अडीच लाख क्युसेक्स विसर्ग गोदावरी पात्रात केला जात आहे. नांदेड शहरातल्या अनेक सखल भागात पाणी शिरलं आहे. गोदावरी काठच्या शंभरहून अधिक कुटुंबांना सुरक्षित

स्थळी हलविण्यात आलं आहे. **लातूर** जिल्ह्याच्या औसा तालुक्यात तेरणानदीचं पाणी काठच्या उजनी गावात शिरलं आहे.

**सोलापूर** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यानं करमाळा, माढा, मोहोळ, अपर तहसील मंद्रूप, उत्तर सोलापूर या तालुक्यामध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानं पाण्याच्या खाली शोध कार्य करण्याच्या क्षमतेच्या ५ यांत्रिक बोटी, सोबत १५ व्यक्तींचं पथक आणि ४५ लाईफ जॅकेट, ५ रिंग उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

**परभणी** जिल्ह्यात गोदावरी आणि दुधना नदीला पूर आला असून ३६ गावांचा संपर्क तुटला असून ५७८ नागरिकांना मदत पथकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केलं. जिल्ह्यात ५ लाख १८ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यातल्या १ लाख ५१ हजार हेक्टर क्षेत्रावरच्या सोयाबीन, कापूस, तूर, मूग, हळद यासह इतर पिकांचं नुकसान झालं. सप्टेंबर महिन्यात २८८ गावातल्या ६६ हजार ३४ हेक्टर वरच्या पिकांचे नुकसान झालं असून पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**<><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विविध भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. या आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य सेवा खंडित होऊ नये यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सज्ज राहण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिल्या आहेत. मुंबई आरोग्य भवन इथे आज या संदर्भात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला अकोला, संभाजीनगर, नाशिक आणि लातूर परिमंडळासह, राज्यातील आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरस्थ पद्धतीने उपस्थित होते. रुग्णांना सर्व प्रकारची सेवा देण्यासासाठी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांनी चोवीस तास उपलब्ध राहावं, तसंच पूरस्थितीच्या काळात जलजन्य आजारावर प्रतिबंध करण्याची तयारी ठेवावी, अशा सूचनाही आबिटकर यांनी यावेळी दिल्या.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८

टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. खाद्य पदार्थावरल्या जीएसटी दरांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**- - सीव्ही -- -**

*(सामान्य माणसाला दिलासा देण्यासाठी खाद्यपदार्थांवरील जीएसटी दर कमी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. अंजीर, बदाम, खजूर यासारख्या सुक्या मेव्यावरचा जीएसटी १२ टक्क्यावरून पाच टक्के झाला आहे. मधुमेहाच्या रुग्णांसाठी असलेल्या विशेष खाद्यपदार्थावरील करही पाच टक्के करण्यात आला आहे. तसंच फळ, भाज्या यांचे दरही कमी होणार आहेत. यामुळे नागरिकांना पौष्टिक खाद्य स्वस्त दरात उपलब्ध होणार असून निरोगी जीवनशैलीसाठी प्रोत्साहन मिळणार आहे. याचा फायदा ग्राहक आणि विक्रेते दोघांनाही होणार आहे. याबाबत ऐकूया एका ग्राहकाची ही प्रातिनिधीक प्रतिक्रिया....*

***- - होल्ड बाईट हर्ष - -***

*जीएसटी सुधारणांमुळे मध्यमवर्गीय तरुण आणि चाकरमान्यांना आरोग्यदायी जीवन जगणं सोपं होणार आहे.)*

**<><><><>**

देशाच्या जहाजबांधणी आणि आणि समुद्रमार्गे व्यापार क्षेत्रातल्या सुमारे ९५ हजार कोटी रुपयांच्या ६ प्रस्तावांना आज केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या क्षेत्राच्या पुनर्सक्षमीकरणासाठी आणि अनुकूल परिसंस्था उभारण्यासाठी ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या योजना मंजूर झाल्या आहेत. देशांतर्गत क्षमता वृद्धी, दीर्घ मुदतीचा वित्तपुरवठा सुधारणं, तसंच जहाजबांधणीसाठी नवीन गोदी निर्मिती आणि जुन्या गोद्यांचं पुनरुज्जीवन या प्रमुख उद्दिष्टांसाठी हा निधी वापरला जाईल. जहाजबांधणी उद्योगासाठीच्या अर्थसहाय्य योजनेला ३१ मार्च २०३६ पर्यंत मुदतवाढ दिली असून त्याकरता २४ हजार ७३६ कोटी रुपये निधीची तरतूद केली आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांना उत्पादकतेवर आधारित ७८ दिवसांचा बोनस देण्यासाठी एक हजार ८६५ कोटी रुपयांचा प्रस्ताव आजच्या बैठकीत मंजूर झाला. याचा लाभ सुमारे १० लाख ९१ हजार रेल्वे कर्मचाऱ्यांना होईल.

क्षमता वाढ आणि मनुष्यबळ विकास याकरता १५व्या वित्त आयोगाच्या कालावधीसाठी २ हजार २७७ कोटी रुपये तरतुदीला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. या अंतर्गत वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभाग तसंच सीएसआयआर आणि तत्सम शैक्षणिक संस्थामधून कौशल्यविकासाकरता व्यासपीठ उपलब्ध करुन दिलं जाईल. वैद्यकीय शिक्षणासाठी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी क्षमता वाढवण्यालाही सरकारने मान्यता दिली. यामुळे एमबीबीएसच्या ५ हजार २३ जागा वाढतील तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५ हजार जागा वाढतील.

**<><><><>**

कर्नाटकमधले ज्येष्ठ साहित्यिक एस एल भैरप्पा यांचं आज हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. वंशवृक्ष, सार्थ, तंडा, काठ, धर्मश्री या कादंबऱ्यांसह त्यांनी विपुल लिखाण केलं आहे. त्यांच्या अंचू, आवेषण, आवरण, तंतू या कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद झाला आहे. कानडीसह मराठी आणि हिंदी भाषेत त्यांचा मोठा वाचकवर्ग होता. भैरप्पा यांना पद्मभूषण, पद्मश्रीसह साहित्यसेवेसाठी साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनबाद्दल दुःख व्यक्त केलं आहे. भैरप्पा यानी साहित्य, संस्कृती आणि तत्वज्ञानाच्या क्षेत्रात अमूल्य योगदान दिल्याचं राष्ट्रपती म्हणाल्या. भैरप्पा यांनी आपल्या लिखाणातून वाचकांची विवेकजागृती केली असं प्रधानमंत्री म्हणाले. तर भैरप्पा यांच्या निधनामुळे साहित्यविश्वात पोकळी निर्माण झाल्याची भावना कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामैय्या यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात ६ जहाल नक्षली अतिरेक्यांनी आज पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या समोर आत्मसमर्पण केलं. यात तीन महिला तर तीन पुरुष नक्षल्यांनी शस्त्र ठेवली असून यात जहाल नक्षली भीमण्णा आणि त्याची पत्नी विमलाक्का यांचा समावेश आहे. यापैकी दोन विभागीय समिती सदस्य, एक कमांडर, दोन पीपीसीएम तर एक एसीएस असून या सर्वांवर ६२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. पुनर्वसनासाठी शासन त्यांना ५२ लाख रुपये देणार आहे.

**<><><><>**

देशातल्या तरुणांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली आहेत. आजच्या सेवा पर्व या विशेष मालिकेत जाणून घेऊ या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राविषयी….

**--- व्हीसी ---**

*(केंद्र सरकारनं गेल्यावर्षी मार्च महिन्यात इंडिया एआय मिशन अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण जाहीर केलं तसंच यासाठी दहा हजार ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. कृत्रिम बुद्धिमत्ता विकास आणि स्वीकार यात आघाडीवर असणाऱ्या दैशांपैकी भारत एक आहे. भारतातल्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले…..*

***होल्ड बाईट मोदी***

*संगणकीय क्षमता, स्टार्टअप्सचा विकास, नवोन्मेष केंद्र तसंच कृत्रिम बुद्धिमत्तेला सुरक्षित आणि विश्वासार्ह वातावरण मिळवून देणं यावर भारताचं एआय मिशन उभारलेलं आहे. हे धोरण जनकेंद्री असून तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण हा याचा गाभा आहे, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.*

*भारतात एक जबाबदार आणि सर्वसमावेश कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणं आणि विकसित भारत २०४७ साठी डिजिटल पाया तयार करणं हे इंडिया एआय या धोरणाचं उद्दिष्ट आहे.)*

**<><><><>**

कृषी क्षेत्राने इंधन आणि उर्जानिर्मितीकडे वळणं देशासाठी गरजेचं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. भारत जैव ऊर्जा आणि तंत्रज्ञानविषयक प्रदर्शनाच्या दुसऱ्या भागाचं उद्घाटन आज गडकरी यांच्या हस्ते नवी दिल्लीत झालं. त्यावेळी ते बोलत होते. देशातली ४५ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे आणि त्यांचा जीडीपीतला वाटा १४ टक्के आहे. शेतमालाला वाजवी दर मिळत नसल्यानं ग्रामीण भागात गरीबी आणि बेरोजगारीची समस्या असल्याचं ते म्हणाले. शेतीतून उर्जानिर्मितीच्या प्रयत्नांना चालना दिल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत आतापर्यंत २ कोटी ८२ लाख घरं बांधून पूर्ण झाली आहेत. ग्रामीण भागात सर्वांना पक्की घरं मिळवून देण्यासाठी २०१६ मधे ही योजना सुरु झाली. पात्र कुटुंबांना स्वयंपाकघर आणि शौचालय अशा सुविधांसह घरं मिळाल्यामुळे जीवनमान उंचावलं आहे.

<><><><>

नांदेड शहरात मगनपुरा भागातून पाचशे रुपयांच्या २६७ बनावट नोटा जप्त करण्यात आल्या असून या प्रकरणी तीन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून १ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

<><><><>

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><>//